# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०१/२०२५ (शनिवार) सायंकाळ**

---

## पोस्टे काटोल येथील व्हिडीओ गेमींग पार्लरवर धाड

पोस्टे काटोल :- दि. २४/०१/२०२५ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ यांना मुखबीरद्वारे खबर मिळाली की, तारबाजार काटोल येथील सुलभ शौचालया जवळील नगर परीषदेचे कॉम्प्लेक्सचे गाळ्यामध्ये संदीप माहुलकर रा काटोल यांचे दुकानात अवैध्यरित्या विनापरवाना व्हीडीओ गेम पार्लर सुरू आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी तारबाजार काटोल येथील नगर परीषदेचे कॉम्प्लेक्स मध्ये रेड कारवाई केली असता **आरोपी संदीप पळसराम माहुलकर वय ५२ वर्ष रा. पेठबुधवार, काटोल जि. नागपूर** हे विनापरवाना बेकायदेशिरपणे व्हीडीओ गेम पार्लर मशिनद्वारे पैशाचे हारजीतचा जुगार आरोपी ग्राहक **मंगेश विनायकराव चरडे वय ३५ वरा. शनी चौक काटोल ता काटोल जि नागपुर** यास खेळवितांना मिळून आला आहे. आरोपीकडुन व्हीडीओ गेम पार्लरच्या इलेक्ट्रोनिक मशीन एकुण १० प्रत्येकी कि. १०,००० रू प्रमाणे एकुण कि. १,००,००० रू व नगदी ४५० रू असा एकुण १,००,४५० रू चा माल जप्त करण्यात आला असुन आरोपी यांचेविरूद्ध कलम २२३ भा. न्या सं., सहकलम ४, ५, १२ (अ) म.जु का प्रमाणे त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक व विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कुही :- दिनांक २४/०१/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ यांना मुखबिरदवारे विश्वनीय माहिती मिळाली कि मौजा तितुर येथे टी, व्ही एस अपाची क्र एम एच ४० बी यु १७२१ वाहनामध्ये अवैद्यरित्या देशी दारूची वाहतुक व विक्री करीत आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता टी, व्ही एस अपाची क्र एम एच ४० बी यु १७२१ चा चालक **आरोपी नामे-१) विवेक विशाल जयस्वाल २) विशाल उर्फ टेकचंद नथुलाल जयस्वाल रा दोन्ही वार्ड क्र २ तीतुर ता कुही जि नागपुर** त्याचे ताब्यातील टी, व्ही एस अपाची क्र एम एच ४० बी यु १७२१ वाहनाची झडती घेतली असता एका थैलीमध्ये १८० एम एल च्या देशी दारू भींगरी संत्रा नं च्या ३८ निपा प्रत्येकी कि ७०/- रू प्रमाणे २६६० /- रू दारू बाळगुन वाहतूक व विक्री करताना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन टी, व्ही एस अपाची क्र एम एच ४० बी यु १७२१ किंमती ७५,०००/-रू २) १८० एम एल च्या देशी दारू भींगरी संत्रा न च्या ३८ निपा प्रत्येकी कि ७०/- रू प्रमाणे २६६०/- रू असा एकुन ७७,६६०/-रू. चा मुद्देमाल ताब्यात घेवुन जप्त केला. नमुद आरोपी याचे विरूध्द कलम ६५ (अ), (ई), ८३ म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर